महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## सेवायोजन जाहिरात क्र. ०६/२०२३

## प्रसिध्दीपत्रक

१. महावितरण कंपनीमध्ये "विद्युत सहाय्यक" या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात क्र. ०६/२०२३ ही दिनांक २९/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. "विद्युत सहाय्यक" पदाची निवड यादी दिनांक ३०/०७/२०२५ रोजी कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. निवड झालेल्या उमेदवारांची कागदपत्रांची पडताळणी व नियुक्तीबाबत परिमंडळनिहाय उमेदवारांची यादी, उमेदवारांना सविस्तर सूचना इ. माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) दिनांक १४/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येऊन कागपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडळामध्ये दिनांक २० ते २२ ऑगष्ट, २०२५ रोजी करण्यात आली आहे.

३. तथापि, उक्त कालावधीत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये भारतीय हवामानशास्त्र विभाग यांनी दिलेला अतिवृष्टीचा इशारा व पूर स्थितीचा विचार करता काही उमेदवार सदर परिस्थितीमुळे अथवा त्यांच्या अपरिहार्य कारणामुळे कागदपत्र पडताळणीकरीता अनुपस्थित राहिल्याने उमेदवारांनी पुनश्च: कागदपत्रे पडताळणीबाबत विनंती केलली आहे. **सबब, शेवटची संधी म्हणून अशा गैरहजर उमेदवारांनी त्यांना वर्ग करण्यात आलेल्या परिमंडळ कार्यालयामध्ये दिनांक ०९ व १० सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता मूळ कागदपत्रांसह उपस्थित रहावे.**

४. उमेदवारांनी परिमंडळनिहाय यादी, कागदपत्र तपासणीकरिता आणावयाची कागदपत्रांची यादी इ. विस्तृत माहितीकरीता कंपनीच्या संकेतस्थळाचे अवलोकन करावे. या प्रक्रियेनंतर गैरहजर उमेदवारांच्या कोणत्याही प्रकारच्या निवेदनाची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

Sd/-
कार्यकारी संचालक (मासं)

दिनांक : २८/०८/२०२५